


## 7.1.9 SENSITIZATION OF STUDENTS AND EMPLOYEES OF THE INSTITUTION TO THE CONSTITUTIONAL OBLIGATIONS: VALUES, RIGHTS, DUTIES AND RESPONSIBILITIES OF CITIZENS.

## CORE VALUES

1. **Intellectual Excellence:**
   The institute is starving continuously for excellence in academic, research and extension activities.
2. **Nation building:**
   The faculty of institute is consistently and honest attempt to develop skill based human resource for nation building
3. **Inclusiveness and respect:**
   The institute has responsibility to address and engage the society with all respect.
4. **Creation and transfer of knowledge:**
   The sole purpose of the institute is to create and transfer knowledge to achieve literacy.
5. **Good governance and decentralization:**
   Authority of the institute always include faculty, student to decentralize any decision. The governance of the institute is always impartial.
6. **Social awareness and commitments:**
   Social awareness and responsibilities are included among the faculty and student by their active engagement in different programmes.
7. **Life skill and values education:**
   Life skill and values education is cultivated among the students through the different courses, by organizing different programme and festivals.
8. **Empowerment of women:**
   The institute organize different programme to empower women socially, economically and politically.
9. **National integration and humanity:**
   Different activities are conducted to imbibe the national integration and humanity among the students, faculty and society.
10. **Adoption of new technology:**
    The institute has thrust to acquire, adopt, and implement new technology to stand firmly in this Globalized world.

Dnyan Prasarak Mandal s
Shikshan Maharshi
**DNYANDEO MOHEKAR MAHAVIDYALAYA**
(Arts, Commerce, Science Vocational & Technical Courses)



Dr. S.V. Pawar
M.A. Ph.D
**PRINCIPAL**

KALAMB - 413507 Dist. Osmanabad
( NAAC Re-Accredited B )

OFFICE (02473) 262142,
FAX (02473) 262146

E-maila - smdmmkl@gmail.com,
Website. - www. mohekarcollege.org

Ref.SMDMMK/National Anthem/2019-20
Date : 07/01/2020

**To Whom Ever It May Concern**

The institution organize every day activity of planning **"National Anthem"** at 11:15 AM to increase consciousness about national identities and symbols, Patriotism; Fundamental Duties and Rights of Indian citizens and other constitutional obligations.

S.M. Dnyandeo Mohekar Mahavidyalaya. * Tq.Kalamb Dist.Osmanabad * KALAMB 413507

PRINCIPAL

Principal
S.M.Dnyandeo Mohekar Mahavidyalaya,
Kalamb Tq.Kalamb Dist..Osmanabad

**ACADEMIC YEAR 2017– 2018**

**Constitutional Obligations: Values, Rights, Duties and Responsibilities of Citizens.**

INDEX

| Sr.no | Name of the programme | Date | Depatment |
|---|---|---|---|
| 1 | Voters awareness Day: Voters registration camp | 22/07/2017 | NSS,NCC |
| 2 | Celebration of Kranti Din | 10/08/2017 | NSS |
| 3 | Marathi Pandharwada | 01/01/2018 | Marathi department |
| 4 | Voters day | 25/01/2018 | NSS |
| 5 | Mock Parliament organized by political science department | 11/09/2018 | Political science |
| 6 | Celebration of Constitution Day | 26/11/2018 | NSS |
| 7 | Awareness about Panchayat Raj | 27/11/2018 | Social science |

**ACADEMIC YEAR 2017– 2018**

1.Voter's awareness Day: Voter's registration camp on 22/07/2017 organized by department of NSS, NCC at Shikshan Maharshi Dnyandeo Mohekar Mahavidyalaya,Kalamb.



लातूर । रविवार, २३ जुलै २०१७

पुण्य नगरी

। वर्ष : १३ । अंक : ११३ । किंमत : ५.०० । पाने १०+४+१२=२६

मोहेकर महाविद्यालयात मतदार नोंदणी कार्यक्रमाचा शुभारंभ

कळंब : शहरातील शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालयात शनिवारी (दि.२२) विशेष मतदार नोंदणी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचा शुभारंभ उपविभागीय अधिकारी डॉ.चारुशिला देशमुख, तहसीलदार अशोक नांदलगावकर, नायब तहसीलदार अस्लम जमादार, रविराज जाधव व प्राचार्य डॉ.अशोक मोहेकर यांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी जानेवारी २०१७ रोजी १८ वर्ष पूर्ण होणाऱ्या युवक, युवतींचे नमुना नंबर ६ चा फॉर्म भरुन घेण्यात आले. तसेच नोडल अधिकाऱ्यांच्या नियुक्त्याही करण्यात आल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ.अशोक मोहेकर यांनी केले. यावेळी तहसील कार्यालयातील निवडणूक नायब तहसीलदार अस्लम जमादार, रविराज जाधव, शंकर पाचभाई, यशवंत हारकर, खलिल शेख, पोपट कांबळे, मतदार केंद्रस्तरीय अधिकारी एन. व्ही. बाकले, वाय डब्ल्यू. पठाण, पी. पी. सलगरे, एस. के पाचपवळ, विशाल वाघमारे, अमोल चव्हाण आदी उपस्थित होते.

**2.Celebration of Kranti Din on 10/08/2017 organized by NSS department. The guest speaker R.V. Ghadge enlighted the Marathwada Muktisangram.**

उस्मानाबाद : ऑगस्ट क्रांती दिनानिमित्त शासकीय, निमशासकीय कार्यालये, संस्था, संघटना, शाळा-महाविद्यालयामध्ये विविध कार्यक्रम घेण्यात आले. उमरगा येथील आदर्श महाविद्यालयात रक्तदान शिबीर घेण्यात आले असता, जळपास ४९ विद्यार्थ्यांनी रक्तदान केले. कळंब येथील मोहेकर महाविद्यालयात व्याख्यानाचा कार्यक्रम पार पडला.




कळंब येथील शि.म. ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालयात व्यख्यानाचा कार्यक्रम घेण्यात आला. याप्रसंगी मार्गदर्शन करताना डॉ. के. जी. घोलप. मंचावर प्रा. आर. व्ही. घाडगे, डॉ. के. डी. जाधव, उपप्राचार्य सुनील पवार आदी.

पाटील, देवानंद एडके, सतीश इंगळगी, सचिन टापरे, अभय वीर, अब्दुल लतीफ, अग्निवेश शिंदे, मदार मेंढके आदी उपस्थित होते.

**श्री समर्थ आश्रमशाळा**

उस्मानाबाद : तालुक्यातील येवती येथील श्री समर्थ आश्रमशाळेत आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राथमिकचे मुख्याध्यापक संदीप पाटील होते. प्रमुख वक्ते माधव कदम यांनी विद्यार्थ्यांना माहिती दिली. सूत्रसंचालन पाचवीतील विद्यार्थिनी पल्लवी खोचरे हिने केले. कार्यक्रमासाठी माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक के. के. आयवले व सांस्कृतिक विभागप्रमुख श्रीकांत शाईवाले, दीपक सर्जे, पंढरी गुळ्वे, महेश पिंपरकर, श्रीनिवास शेळ्के, पी. पी. पाटील यांच्यासह शाळेतील सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**मोहेकर महाविद्यालय**

कळंब : शि.म. ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून ऑगस्ट क्रांती दिन कार्यक्रम साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर गुरुजी व राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या प्रतिमा पूजनाने झाली. व्यासपीठावर डॉ. के. डी. जाधव, तर अध्यक्षपदी महाविद्यालयाचे उपप्राचार्य सुनील पवार उपस्थित होते. यानिमित्त प्रा. डॉ. के. जी. घोलप व प्रा. आर. व्ही. घाडगे यांचे व्याख्यान झाले. प्रास्ताविक प्रा. डॉ. दीपक सूर्यवंशी यांनी, सूत्रसंचालन डॉ. मीनाक्षी जाधव, तर आभार प्रा. ईश्वर राठोड यांनी मानले. यावेळी प्रा. मुखेडकर, प्रा. सावंत, प्रा. डॉ. कालवणे, डॉ. साकोळे, प्रा. शिंदे, संदीप सूर्यवंशी तसेच विद्यार्थी विद्यार्थिनींची उपस्थिती होती.

**तुळजाभवानी सैनिकी विद्यालय**

तुळजापूर :

प्रथमच अल्प द
विवाहापुर्वी व वि

आशाकिरण

**3.Marathi Pandharwada 01/01/2018 organized by Marathi department**




# मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा



प्रतिनिधी

विद्यार्थी व उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. दि. १० रोजी अजब प्रकाशन कोल्हापूर या प्रकाशन संस्थेचे ग्रंथ प्रदर्शन व विक्रीचे आयोजन करण्यात आले. याचे उद्‌घाटन बडोदा येथे होणाऱ्या अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे अध्यक्ष लक्ष्मीकांत देशमुख यांच्या हस्ते झाले. दि. ११ रोजी शिवाजी महाविद्यालय बार्शी येथील मराठी विभाग प्रमुख प्रोफेसर भारती रेवडकर यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी त्यांनी विविध वाङ्‌मयीन प्रवाहाचे संदर्भ देत साहित्याचे, भाषेचे महत्व विषद केले.

या उपक्रमाचे आयोजन प्राचार्य डॉ. अशोक मोहेकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. या नियोजनात प्र. प्राचार्य डॉ. सुनील पवार व उपप्राचार्य प्रा. जे. यु. घोलप, प्रा. डॉ. व्ही. एस अनीगुटे, डॉ. दत्ता साकोळे, डॉ. के. डी. जाधव, मराठी विभागाने परिश्रम घेतले.

**4.Voters day organized by NSS Department**

# मतदार जागृती, नावनोंदणी अभियान

**कळंब :** शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालयात स्वीपअंतर्गत मतदान जागृती, नवमतदार नावनोंदणी अभियान रासेयो व तहसील कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने झाला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपविभागीय अधिकारी डॉ. चारुशीला देशमुख उपस्थित होत्या. देशमुख म्हणाल्या, की महाविद्यालयातील विद्यार्थी हा नवमतदार आहे. तुम्ही स्वत: नाव नोंदणी करावी, दुसऱ्यांना नोंदणी करण्यास सांगावे. या वेळी उपप्राचार्य जी. यू. घोलप, तहसीलदार अशोक नांदलगावकर, अस्लम जमादार आदींची उपिस्थती होती. यानिमित्ताने आयोजित निबंध स्पर्धेत ५१ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. नांदलगावकर म्हणाले, की लोकशाही बळकटीसाठी तरुणांची भूमिका महत्त्वाची आहे. या निमित्ताने विविध निवडणूक कार्यक्रमात अग्रेसर रहावे, असे आवाहन केले. नायब तहसीलदार अस्लम जमादार यांनीही यावेळी मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन रासेयो प्रमुख डॉ दीपक सूर्यवंशी यांनी, आभार डॉ नामानंद साठे यांनी मानले. कार्यक्रमासाठी डॉ दादाराव गुंडरे, डॉ. के. डी. जाधव, प्रा.इ. एल. राठोड, डॉ. के. एल. काळवणे, प्रा रोहित मोहेकर, प्रा. के. बी.डोके, श्री संदीप सूर्यवंशी आदींनी प्रयत्न केले.

**5. Mock Parliament organized by Political Science Department**




**6.Celebration of Constitution day 26/11/2018 organized by NSS Department**



**मोहेकर महाविद्यालयात संविधानदिन साजरा**

**कळंब :** शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालयात संविधान दिनाचा कार्यक्रम घेण्यात आला. प्रभारी प्राचार्य डॉ. एस. व्ही. पवार यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करून भारतीय संविधानाचे पूजन करण्यात आले. त्यानंतर भारतीय संविधानाची ओळख या विषयावर डॉ. नामानंद साठे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी अध्यक्षीय समारोप प्रसंगी डॉ. एस. व्ही. पवार यांनी मार्गदर्शन केले. ग्रंथपाल प्रा. अनिल फाटक यांनी सूत्रसंचालन तर आभार अरविंद शिंदे यांनी मानले. यावेळी उपप्राचार्य प्रा. डी. बी. गपाट, डॉ. के. डी. जाधव, डॉ. हनुमंत चौधरी, प्रा. बाबर बालाजी, संदीप सुर्यवंशी, शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थी

**7.Awareness about Panchayat Raj organized by department of Social Science 27/11/2018**



**ACADEMIC YEAR 2018– 2019**

**Constitutional Obligations: Values, Rights, Duties and Responsibilities of Citizens.**

**INDEX**

| Sr.no | Name of the programme | Date | Depatment |
|---|---|---|---|
| 1 | Voters awareness Day: street play | 14/09/2018 | NSS, |
| 2 | Celebration of marathwada Mukti Sangram Din | 17/08/2018 | NSS |
| 3 | Promoting brotherhood: visit and cleanness drive at various places of worship | 19/09/2018 | NSS |
| 4 | Mock Parliament | 11/09/2018 | Political Science |
| 5 | Participation in Ganpati Visarjan: helping hand to Police | 24/09/2018 | NSS |
| 6 | Door to door meet at slum area and survey | 26/09/2018 | NSS |
| 7 | Celebration of Constitution Day: Dr. Gundare | 26/11/2019 | college |

**1.Voters awareness Day: street play   26/11/2018 organized by NSS**




मतदार जागृतीनिमित्त पथनाट्य सादरीकरण करताना स्वयंसेवक विद्यार्थी व रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रा. सूर्यवंशी प्रा. ईश्वर राठोड, डॉ. एम.बी. जाधव, प्रा. मुखेडकर, प्रा. मावडे




सोबत स्वयंसेवक विद्यार्थिनी - विद्यार्थी - श्री संजीव बागलसाहेब.


**2. Celebration of marathwada Mukti Sangram Din on 17/08/2018 organized by NSS department .Guest speaker was Mr. Vishal Pawar.**



**3. Promoting brotherhood: visit and cleanness drive at various places of worship**
**19/09/2018 NSS**



मस्जिद परिसर स्वच्छता करताना न.प. अधिकारी श्री अरविंद शिंदे, प्रा. ईश्वर राठोड, प्रा. जाधव व प्रा. मुखेडकर व स्वयंसेवक..



**4. Mock Parliament organized by political science department on 11/09/2018**

सोलापूर तरुण भारत

बुधवार, १२ सप्टेंबर, २०१८ | भाद्रपद शु. ३, युगाब्द ५१२०

# विद्यार्थी संसद कार्यक्रम उत्साहात

**तालुका प्रतिनिधी**
**कळंब, दि. ११ सप्टेंबर-**

शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालयामध्ये राज्यशास्त्र विभागाच्यावतीने मतदार जनजागृती अभियानांतर्गत विद्यार्थी संसद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाचे उद्घाटन नायब तहसीलदार अस्लम जमादार यांनी केले. प्रमुख उपस्थितीमध्ये संस्थेचे सचिव डॉ. अशोकराव मोहेकर, विस्ताराधिकारी बागल, केंद्रप्रमुख धावारे, उपप्राचार्य प्रा. जी. यु. घोलप उपस्थित होते. अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ. सुनिल पवार उपस्थित होते.

अस्लम जमादार यांनी विद्यार्थी संसदेच्या उद्घाटन प्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी अटलबिहारी वाजपेयी यांना श्रद्धांजली वाहून नविन सभासदांना शपथ दिली. त्याचबरोबर सभागृहात केरळ पूरग्रस्त परिस्थिती विषयी लक्षवेधी सूचना मांडली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व प्रास्ताविक डॉ. नामानंद साठे तर आभार प्रा. ईश्वर राठोड यांनी मानले.

यावेळी डॉ. अनिगुंठे, डॉ. गायकवाड, डॉ. सूर्यवंशी, डॉ. चौधरी, प्रा. चांदोरे, डॉ. ढोले, डॉ. जाधव, प्रा. पावडे, प्रा. मुखेडकर, अरविंद शिंदे, प्रा. मानेकर, संदीप सूर्यवंशी यांच्यासह विद्यार्थी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**5. Participation in Ganpati Visarjan: helping hand to Police 24/09/2018**



▫ गणपती विसर्जन ठिकाणी निर्माल्य संकलन करताना रासेयो विद्यार्थी, पी.आय. वाघुले, प्रा. ईश्वर राठोड व नागरिक...




▫ यावेळी स्वयंसेवक आणि नागरिक...

**6. Door to door survey at Indiranagar kalamb and survey 26/09/2018 NSS**




▫ इंदिरानगर परिसरात 'डोअर-टू-डोअर' सर्वे करताना यावेळी झोपडपट्टीवासीय कार्यक्रमाधिकारी व स्वयंसेवक



▫ सर्वे करताना विद्यार्थी-विद्यार्थिनी व कार्यक्रमाधिकारी डॉ. दिपक सूर्यवंशी व प्रा. ईश्वर राठोड.

**7. Celebration Constitution Day: Dr. Gundare 26/11/2019**

सोलापूर महाराष्ट्र व मराठवाड्यात सर्वाधिक गावी जाणारे दैनिक
तरुण भारत
सोलापूर तरुण भारत मिडिया लिमिटेड

# सर्वसमावेशक संविधानाने लोकशाहीला बळकटी : गुंडरे

**तालुका प्रतिनिधी**
**कळंब दि. ७ डिसेंबर**

शि. म. ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व राष्ट्रीय केमिकल्स अँन्ड फर्टिलायझर्स लि. जि. धाराशिवच्या संयुक्त विद्यमाने संविधान दिनानिमित्त व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

याप्रसंगी प्रमुख मार्गदर्शक डॉ. दादाराव गुंडरे यांनी सांगितले की, सर्वसमावेशक भारतीय संविधानाने लोकशाहीला बळकटी दिली आहे. तसेच वाचनाने जीवन समृद्ध होते, डॉ. बाबासाहेबांच्या ज्ञानसंपादनाचा आदर्श समोर ठेवून विद्यार्थ्यांनी जीवनाची वाटचाल करावी, असे त्यांनी सांगितले. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. सुनिल पवार यांनी डॉ. बाबासाहेबांनी संपुर्ण देशाला समतेची आणि स्वातंत्र्याची शिकवण देणारे भारतीय संविधान



दिले. तसेच संपुर्ण समाजाला डॉ. आंबेडकारांच्या विचारांची गरज आज देखील आहे. असे मत त्यांनी मांडले. यावेळी भारतीय संविधानाच्या प्रस्ताविकेचे सामुहिक वाचन करण्यात आले. या कार्यक्रमाची सुरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमा पुजनाने करण्यात आली.

प्रास्ताविक प्रा. जे. जी. लोकरे यांनी केले, विनोद दिघाडे यांनी डॉ. आंबेडकारांच्या विचारांचा आदर्श आजच्या तरुणांनी घेतला पाहिजे, असे मत व्यक्त केले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. एन. एम. अदाटे यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. ईश्वर राठोड यांनी केले. या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थितीत उपप्राचार्य प्रा. जी. यु. घोलप, प्रा. डॉ. दिपक सूर्यवंशी, डॉ. मिनाक्षी जाधव, डॉ. मुकुंद गायकवाड, प्रा. अर्चना मुखेडकर, डॉ. दत्ता साकोळे, डॉ. नामानंद साठे, प्रा. शाहरुख शेख तसेच रासेयो स्वयंसेवक स्वयंस्फुर्तपणे उपस्थित होते.

ACADEMIC YEAR 2019-20

**Constitutional Obligations: Values, Rights, Duties and Responsibilities of Citizens.**

INDEX

| Sr.no | Name of the programme | Date | Depatment |
|---|---|---|---|
| 1 | Social Justice Day | 21/06/2019 | POLITICAL SCIENCE ,NSS |
| 2 | Voters awareness day | 29/07/2019 | NSS |
| 3 | Relief Fund for Kolhapur and Sangli flood | 14/08/2019 | NSS |
| 4 | Eye check up | 25/08/2019 | Alumini og college |
| 5 | Helping hand Municipal Corporation in Ganesh Visarjan | 10/09/2019 | NSS |
| 6 | Marathwada Mukti Sangram Din | 17/09/2019 | NSS |
| 7 | Voters Enrollment | 04/10/2019 | NSS |
| 8 | 8.Inagration of literary society by English Hindi and Marathi department | 6/10/2019 | English Hindi and Marathi department |
| 9 | A talk Constitution Day: By Namanand Sathe | 26/11/2019 | COLLEGE |
| 10 | Speech on Role of youth in Nation building: Dr. Ram Chavan | 13/12/2019 | NSS |
| 11 | Lok Adalat Prasar | 13/01/2020 | NCC |
| 12 | Marathi Bhasha Din | 27/02/2020 | Marathi Department |
| 13 | व्यसनमुक्त जीवन काळाची गरज# प्रा.डाॅ.हनुमंत तुकाराम माने | Apr 23, 2020 | https://youtu.be/kLT88L-x9ys |

**1.Social Justice Day organized by Department of Political Science and NSS on date 21/06/2019**




सामाजिक न्याय दिनानिमित्त मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ. सुनिल पवार उपस्थित प्रा. ईश्वर राठोड आदी









उपस्थित कार्यक्रमाधिकारी श्री तावडे, प्रा. दिलीप [illegible] व स्वयंसेवक व स्वयंसेविका.

10


**2. Voters awareness day organized by department of NSS 29/07/2019**





मतदार जनजागृती अभियान रॅ
महाविद्यालय मतदान करण्यासं
-चे शपथ व रॅलीतील सहभागी
रासेयो स्वयंसेवक .



### 3. Relief Fund for Kolhapur and Sangli flood 14/08/2019 NSS


1. कोल्हापूर- सांगली पुरग्रस्त मदत निधी - रॅलीचे आयोजन






पुरग्रस्त मदत निधी साठी काढण्यात आलेल्या रॅलीला मदत करित असताना संस्थेचे सचिव डॉ. अशोकराव मोहेकर, डॉ. संजय कांबळे तसेच कळंबधील रॅली व मदत करित असताना एक सामान्य व्यापारी.



**4. Eye checkup organized by alumini of college on 25/08/2019**






## संक्षिप्त वृत्त

### शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर स्मृतिदिनानिमित्त नेत्र तपासणी शिबीर

**तालुका प्रतिनिधी**
**कळंब दि. २७ ऑगस्ट**

शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालयिन माजी विद्यार्थी समाज सेवा मंडळ कळंब व रोटरी क्लब ऑफ कळंब सिटी यांच्या संयुक्त विद्यमाने ज्ञानदेव मोहेकर गुरुजी यांच्या २८ वी व्या स्मृतिदिनानमित्त दि. २५ ऑगस्ट रोजी मोफत नेत्र तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबीराचे उद्घाटन ज्ञानप्रसारक मंडळाचे सचिव डॉ. अशोकराव मोहेकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष प्रा. आबासाहेब बारकुल, संचालक डॉ. डी. एस.जाधव, प्रा. संजय मिटकरी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुनिल पवार, अनिल मोहेकर, रोटरीचे अध्यक्ष हर्षद अंबुरे,सचिव डॉ. हनुमंत चौधरी, प्रोजेक्ट चेअरमन अरविंद शिंदे, संजय देवडा, विश्वजीत ठोंबरे, निखिल भडंगे, प्रा. अनिल फाटक, प्रा. ईश्वर राठोड, डॉ.एच.के भगवान, डॉ. के. डी. जाधव, प्रा. राहुल भिसे आदी मान्यवर उपस्थित होते. दिवसभरात जवळपास एकुण १३३ जणांची नेत्रचिकित्सक शिवरुद्र इशाके व वैशाली झांबरे यांनी डोळे तपासणी केली.


**5. Helping hand Municipal Corporation in Ganesh Visarjan 10/09/2019 NSS**







• गणपती विसर्जनासाठी /
ठिकाणी निर्माल्य संकलन
करण्यासाठी राष्ट्रीय सेवा
योजना विभागातील स्वयंसेवक
समवेत नगरपरिषद - श्री. विशाल
भोसले व रासेयो कार्यक्रमाधिकारी
प्रा. ईश्वर राठोड व डॉ. गायकवाड





**6. Marathwada Mukti Sangram Din 17/09/2019 NSS**



**7. Voters Enrollment 04/10/2019 NSS**





○ मतदार नोंदणी अभियान प्रसंगी मार्गदर्शन करतांना श्री. असलम जमादार (नायब-तहसिलदार.



○ मतदार नोंदणीचे फार्म वितरण करतांना मा. अशोकराव [illegible] प्राचार्य डॉ. सुनिल पवार, नायब तहसिलदार- असलम जमादार.

**8. Inauguration of literary society by English Hindi and Marathi Department on 6/10/20**



पुरोगामी विचाराचे

# एकमत

संस्थापक : विलासराव देशमुख

उस्मानाबाद ◆सोमवार, दिनांक ०७ ऑक्टोबर २०१९ ◆वर्ष ०७ वे । अंक : २७४ वा ◆पाने १२ ◆किमत : ४ रुपये

## मोहेकर महाविद्यालयात वाङ्मय मंडळाचे उद्‌घाटन

**कळंब :** डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ संलग्नित शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालयात शुक्रवारी (दि.४) मराठी, हिंदी व इंग्रजी विषयाच्या वाङ:मय [illegible]ळाचे मान्यवरांच्या हस्ते उद्‌घा[illegible] करण्यात आले.

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. सुनिल पवार हे होते. तर प्रा. डॉ. देविदास इंगळे, प्रा. डॉ अरविंद हंगरगेकर, प्राचार्य पी. एस. शिंदे, संस्थेचे सचिव डॉ. अशोकराव मोहेकर यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या शब्द फ[illegible]लोरा या भितीपत्रकाचे मान्यवरांच्या हस्ते विमोचन करण्यात आले.

यावेळी डॉ. देविदास इंगळे, प्रा. डॉ अरविंद हंगरगेकर, प्राचार्य पी. एस. शिंदे, डॉ. अशोकराव मोहेकर यांनी मार्गदर्शन केले प्रास्ताविक डॉ. दत्ता साकोळे, सूत्रसंचालन डॉ. केदार काळवणे तर उपस्थितांचे आभार डॉ. के. डी. जाधव यांनी मानले. कार्यक्रमासाठी डॉ. एम. डी. गायकवाड, डॉ. डी. ई. गुंडरे, डॉ. दिपक सूर्यवंशी, प्रा. एन. एम. अंकुशराव यांनी परिश्रम घेतले. एन. जी.साठे, प्रा.ई. एल. राठोड, प्रा. बी. एस सावंत, प्रा. बालाजी बाबर, अरविंद शिंदे यांच्यासह शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**9. A talk Constitution Day: By Namanand Sathe 26/11/2019 COLLEGE**



**10.Speech on Role of youth in Nation building 13/12/2019**

दैनिक दिव्य मराठी 13/12/2019

# राष्ट्राच्या विकासात तरुणांचे योगदान महत्त्वपूर्ण, ग्रामीण भागात काम करा

प्रतिनिधी | कळंब




करंजकल्ला येथे राष्ट्रीय सेवा योजना शिबिरात मान्यवरांनी मार्गदर्शन केले.

राष्ट्राच्या विकासात तरुणांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे, असे प्रतिपादन प्रा. डॉ. राम चव्हाण यांनी केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद व येथील शिक्षणमहर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने आयोजित 'ग्रामस्वच्छता व जलसंवर्धनासाठी युवक' या विशेष श्रमसंस्कार शिबिराचे करंजकल्ला येथे उद्‌घाटन झाले, त्यावेळी डॉ. चव्हाण बोलत होते.

कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थेचे सचिव डॉ. अशोकराव मोहेकर, प्राचार्य डॉ. सुनिल पवार, सरपंच विशाल पवार, उपसरपंच विलास पवार यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रा. डॉ. राम चव्हाण म्हणाले की, राष्ट्रीय सेवा योजनेला ५० वर्षे पूर्ण झाले व महात्मा गांधीजींच्या १५० व्या जयंतीनिमित्त त्यांच्या स्वप्नांतील विचार घेऊन एनएसएसच्या विद्यार्थ्यांनी ग्रामीण भागामध्ये काम केले पाहिजे. सात दिवसीय शिबिराचे आयोजन करण्यासाठी कार्यक्रमाधिकारी व शिबिर समन्वयक म्हणून प्रा. ईश्वर राठोड, डॉ. मुकुंद गायकवाड, डॉ. संदीप महाजन यांनी पुढाकार घेतला. प्रास्ताविक प्रा. अर्चना मुखेडकर यांनी तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. मीनाक्षी जाधव व आभार डॉ. पल्लवी उंदरे यांनी केले.

**11.Awareness about Lok Adalat, how to resolve the problem at local level and trust on law, it was organized by NCC department in association with court. On 13/01/2020**

उस्मानाबाद ◆सोमवार, दिनांक १३ जानेवारी २०२० ◆वर्ष ०८ वे । अंक : १३ वा ◆पाने १२ ◆किंमत : ४ रुपये

पुरोगामी विचाराचे

# एकमत

संस्थापक : विलासराव देशमुख

## लोक अदालत प्रसार, प्रचारासाठी कायदेविषयक शिबीर

**कळंब** : येथे लोकअदालतचा प्रसार व प्रचार करण्यासाठी उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद व फिरते विधी सेवा केंद्र मार्फत विधी सेवा समिती कळंबमध्ये चार दिवसीय कायदेविषयक शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. ९ ते १२ जानेवारी दरम्यान हे उच्च न्यायालय खंडपीठ यांच्या मार्फत फिरते विधी सेवा केंद्र व लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले आहे.

कळंब तालुका विधी सेवा समिती व विज्ञान मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने तालुका विधी सेवा समिती कळंब येथे लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले होते. ९ जानेवारी रोजी न्यायालयाचे न्यायाधीश एम.डी.ठोंबरे यांनी फिरते विधी सेवा केंद्रा व लोकअदालत वाहनाचे उद्घाटन करून खोंदला येथे कायदेविषयक शिबीर घेण्यात आले. त्यानंतर १० जानेवारी रोजी वाघोली येथे शिबीर झाले. ११ जानेवारीला कळंब येथे लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले होते. व १२ जानेवारी रोजी शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय येथील विद्यार्थ्यांनी शहरांमध्ये घोषणा देत रॅलीचे आयोजन केले होते यामध्ये साधता संवाद संपत वाद, भांडण्यापेक्षा समजोता बरा मिळेल त्यातच आनंद अशा प्रकारच्या घोषणा देत रॅली काढण्यात आली



.कार्यक्रमासाठी दिवाणी न्यायाधीर एम.डी. ठोंबरे, एम. बी. कुडते, ॲड. एस.एम. जाधवर, बी.बी. साठे, एम. के. मुळीक, डॉ. के. डब्ल्यू पवाडे, अरविंद शिंदे, संदीप सुर्यवंशी महाविद्यालयातील विद्यार्थी व न्यायालयीन कर्मचारी मोठ्या संख्येने हजर होते.

**12.Marathi Bhasha din organized by Marathi Department on 27/02/2020.**

मु.अ. शिंदे यांनी केले व होरे सर यांनी सर्वाचे अभार मानले.

## मोहेकर महाविद्यालयात जागतिक मराठीदिन



**कळंब** : डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ संलग्नित शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालयात कवी कुसुमाग्रज ऊर्फ वि.वा. शिरवाडकर यांचा जन्मदिन हा जागतिक मराठी राजभाषा दिन म्हणून साजरा करण्यात आला. ज्ञान प्रसारक मंडळ संस्थेचे सचिव डॉ. अशोकराव मोहेकर यांच्या हस्ते कवी कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी म हाविद्यालयाचे प्रा. डॉ.सुनील पवार, मराठी विभागाचे प्रमुख डॉ.दादाराव गुंडरे, प्रा.डॉ.दिपक सुर्यवंशी, डॉ.हेमंत भगवान, डॉ.एम.डी गायकवाड, प्रा.एस.ए.मि टकरी, प्रा.के.बी.डोके, डॉ.के.डी.जाधव, डॉ एच.एल.चौधरी, डॉ.एम.बी.जाधव, प्रा.ए.आर मुखेडकर, प्रा.के.डब्लू.पावडे, प्रा.एन.एम.अंकुशराव, प्रा.राहूल भिसे, प्रभारी प्रबंधक के.एन.वीर यांची प्रमुख उपस्थिती होती.

**▶कर वसुलीवर पुन्हा चर्चा**

## उस्मानाबाद न. प.चे १

**शहर प्रतिनिधी**

**उस्मानाबाद** : नगरपरिषदेच्या विविध विषयांचा आढावा घेवून अंदाजपत्रक सादर करण्यात आले.

**13. व्यसनमुक्त जीवन काळाची गरज# प्रा. हनुमंत**

**तुकाराम माने Apr 23, 2020** https://youtu.be/kLT88L-x9ys

**ACADEMIC YEAR 2020-21**

**Constitutional Obligations: Values, Rights, Duties and Responsibilities of Citizens.**


**INDEX**

| Sr.no | Name of the programme | Date | Depatment |
|---|---|---|---|
| 1 | Celebration of Constitution Day | 26/11/2020 | COLLEGE |
| 2 | Mask Donation Camp | 12/12/2020 | COLLEGE |
| 3 | Indian Constitution and Women: Smt. Mangala | 25/12/2020 | https://youtu.be/a5L8cJCuKzQ |

**1.Celebration of Constitution Day 26/11/2020 COLLEGE**

□ संविधान दिन □


दि. २६ नोव्हेंबर 202





रासेयोच्यावतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर व राज्य-घटनेचे पूजन करताना संस्थेचे सचिव डॉ. अशोक-राव मोहकर व समवेत कर्मचारीवृंद

**2.Mask Donation Camp 12/12/2020 COLLEGE**



★ मास्क वाटप कार्यक्रम -

12/12/2020

१) मास्क वाटप करताना संस्थेचे सचिव डॉ. अशोकराव मोहेकर प्राचार्य डॉ. सुनिल पवार, उपप्राचार्य डॉ. सतिश लोमटे व आदी.

**3.Indian Constitution and Women: Smt. Mangala 25/12/2020**

(https://youtu.be/a5L8cJCuKzQ)

▸ मोहेकर व्याख्यान माला ऑनलाईन

# भारतीय संविधानाने महिलांना अनेक क्षेत्रात समानतेची संधी मिळवून दिली

**कळंब** : शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर चॅरिटेबल ट्रस्ट व रोटरी क्लब ऑफ कळंब सिटी यांच्या संयुक्त विद्यमाने प्रतिवर्षीप्रमाणे शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर स्मृती व्याख्यानमाला नुकतीच आयोजित करण्यात आली.

यावर्षी कोरोनाच्या पार्श्वभूमिवर व्याख्यानमाला झूम अँपद्वारे ऑनलाईन घेण्यात आली. व्याख्यानमालेचे हे नववे वर्ष होते. या तीन दिवसीय व्याख्यानमालेत अनुक्रमे दि.२५ डिसेंबर रोजी डॉ. मंगला खिंवसरा, औरंगाबाद यांनी भारतीय संविधान आणि महिला. या विषयावर पहिले पुष्प गुंफले, दि.२६ डिसेंबर डॉ. अपर्णा कोत्तापल्ले, औरंगाबाद यांनी सामाजिक स्थित्यंतरे आणि कायद्याची भूमिका या विषयावर व्याख्यान दिले, तर दि.२७ डिसेंबर रोजी मुंबई विद्यापीठाच्या प्रमुख डॉ. वंदना महाजन यांनी सावित्रीबाई फुलेंच्या कार्याची प्रस्तुतता या विषयावर व्याख्यान दिले. या वर्षीच्या व्याख्यान मालेचे वेगळेपण म्हणजे गत आठ वर्षापासून सुरू असलेल्या व्याख्यानमालेत पहिल्यांदाच तीनही महिला व्याख्यात्यांनी आपल्या विचारातून सामाजिक मूल्यांचा व स्त्रीविषयक दृष्टिकोन यावर भर दिला. ताराबाई शिंदे, रमाबाई, राष्ट्रमाता, राजमाता जिजाऊ, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आदींच्या तत्कालीन प्रतिकूल परिस्थितीतून केलेल्या सामाजिक कार्यासंबंधीची भूमिका विशद केली. व्याख्यानाच्या शेवटच्या दिवसी काही श्रोत्यांनी प्रतिक्रिया व्यक्त केली त्यामध्ये डॉ. दया पाटील, औरंगाबाद, प्राचार्य जगदीश गवळी, संतोष लिमकर, ऋतुजा मिटकरी हे होते. या तिने दिवसीय व्याख्यानमालेमध्ये १२० लोकांनी सहभाग नोंदवला होता.



या व्याख्यानमालेसाठी शि.म. ज्ञानदेव मोहेकर चॅरीटेबल ट्रस्टचे अध्यक्ष तथा ज्ञान प्रसारक मंडळाचे सचिव डॉ. अशोकराव मोहेकर, मोहेकर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुनिल पवार, उपप्राचार्य रामकृष्ण गोरमाळी, डॉ. के... काळवणे, रोटरी क्लबचे अध्यक्ष गिरीश कुलकर्णी, सचिव डॉ. स... पवार, प्रोजेक्टचे चेअरमन डॉ. हनु... चौधरी, को. चेअरमन अरविंद ... यांनी सहकार्य केले. या व्याख्यानमालेसाठी महाराष्ट्रातील प्रामुख्य... औरंगाबाद, बीड, कराड, शि... मुंबई, नांदेड, लातूर, सोलापूर अ... विविध ठिकाणावरून मान्यवरां... व्याख्यानमालेचा लाभ घेतला उस्फु... सहभाग नोंदवला.

दैनिक एकमत दिनांक ३० डिसेंबर २०२०

**ACADEMIC YEAR 2021-22**

## Constitutional Obligations: Values, Rights, Duties and Responsibilities of Citizens.

### INDEX

| Sr.no | Name of the programme | Date | Depatment |
|---|---|---|---|
| 1 | Celebration of Constitution Day | 26/11/2021 | College |
| 2 | A talk on Strengthening of democratic values: By Niranjan Awate | 26/12/2021 | college |
| 3 | Blood Donation Camp | 17/09/2021 | NSS & NCC |

### 1.Celebration of Constitution Day 26/11/2021 College


26 नोव्हेंबर 2021 राजा महाविद्यालयात रासेयो विभागाच्या
वतीने संविधान दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी



प्रतिमा पूजन करताना मान्यवर.

ागत
ा करताना
दिपक सुर्यवंशी






**2. A talk on Strengthening of democratic values: By Niranjan Awate 26/12/2021 College**






**3. Blood donation camp organized by NSS and NCC Department 17/09/2021**

# मोहेकर महाविद्यालयात ५१ जणांचे रक्तदान



**प्रतिनिधी**

**कळंब :** दि. ३० शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर गुरुजीच्या २६ व्या स्मृतिदिनानिमित्त रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले. यामध्ये एन. एस. व एन. सी. सी. च्या स्वयंसेवकांनी एकूण ५१ जणांनी रक्तदान केले.

भगवंत ब्लड बँक बार्शी येथील सुधीर सुमंत व त्यांच्या सहकार्यांने रक्ताचे सकलंन केले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोकराव मोहेकर यांच्या मार्गदर्शनाखाली एन. एस. व एन. सी. सी. विभागाने सदर शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराचे नियोजन एन. सी. सी. प्रमुख डॉ. व्ही. एस. अनिगुटे, एन. एस. एस. प्रमुख डॉ. डी. एस. सूर्यवंशी, डॉ. डी. एन. चिंते, प्रा. ईश्वर राठोड, प्रा. श्रीमती डॉ. एम. बी. जाधव, श्रीमती ए. आर. मुखेडकर यांनी परिश्रम घेतले.

या प्रसंगी उपस्थित उपप्राचार्य डॉ. एस. व्ही. पवार, डॉ. एच. के. भगवान, डॉ. भरत गपाट, प्रबंधक एस. एस. जाधव, कार्यलयीन अधीक्षक के. एन. वीर आदींची उपस्थिती होती.

## अबुतलहा मुजावरचा पुण्यात सत्कार

**प्रतिनिधी**

**वाशी :** येथील छत्रपती शिवाजी विद्यालयाचा विद्यार्थी अबुतल्हा मुजावर याने इ. १० वीच्या परिक्षेत मिळवलेल्या यशाबद्दल पुणे येथे सन्मानीत करण्यात आले. रोख पाच हजार, एक टायटन कंपनीचे घड्याळ, मानचिन्ह, प्रमाणपत्र,